# अंतिम सत्राच्या परीक्षा झाल्याच पाहिजेत

## विद्यापीठ विकास मंचतर्फे आयोजित चर्चासत्रात तज्ज्ञांचा सूर

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पदवी व पदव्युत्तरच्या अंतिम सत्राच्या परीक्षा घ्यायच्या की नाही यावर दोन मतप्रवाह आहेत. मात्र कोरोना आटोक्यात आल्यानंतर विद्यार्थी व पालक यांच्या सहमतीने आणि विद्यापीठ यंत्रणा परीक्षा घेण्यासाठी सज्ज आहे का याचा विचार करून, विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसीच्या) मार्गदर्शक सुचनांप्रमाणे अंतिम सत्राच्या परीक्षा घ्याव्यात, असा सूर विद्यापीठ विकास मंचच्या वतीने आयोजित ऑनलाईन चर्चासत्रात तज्ज्ञांचा होता.

विद्यापीठ विकास मंचच्या वतीने 'अंतिम सत्र मूल्यांकन: पर्याय व आवश्यकता' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते. चर्चासत्राचे ऑनलाईन उद्घाटन युजीसीचे उपाध्यक्ष भूषण पटवर्धन यांच्या हस्ते करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरु व्ही. ए. रायकर, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अभाविपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. प्रशांत साठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अंतिम सत्राच्या परीक्षा घेतल्या नाहीत तर विद्यार्थ्यांची गुणवत्ता सिध्द होणार नाही. विद्यार्थ्यांना सरसरी गुणांवर उत्तीर्ण केले तर यापुर्वीच्या जळीत बी. ए. डिग्रीचे विद्यार्थी या प्रमाणे 'कोविड प्रमोटेड बॅच' असे विद्यार्थ्यांना संबोधले जावू शकेल अशी शंकाही तज्ज्ञांनी व्यक्त केली. तसेच सरासरी गुणांचा परिणाम पुढील उच्च शिक्षणवर आणि परदेशी जावून शिक्षण, संशोधन व नोकरी, करणाऱ्या विद्यार्थ्यांना अडचणी येवू शकतात. त्यामुळे कोरोना संसर्ग अटोक्यात आल्यानंतर ओपन बुक पद्धतीने, तोंडी परीक्षा, ऑनलाईन परीक्षा घ्यावी. असा सूर बहुतांश तज्ज्ञांचा होता. प्रमुख मार्गदर्शकांसह २०० विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांनी सहभाग नोंदवला होता.

चर्चासत्रात शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, सांगली येथील डॉ. पतंगराव कदम विद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी कणसे, वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव ॲड. धैर्यशील पाटील, कराड येथील महिला महाविद्यालयाच्या प्रा. इला जोगी, पॉझिटिव्ह मेंटरिंग पम्पचे संस्थापक व कार्यकारी संचालक सुधीर मुतालिक, पुणे येथील याचिकाकर्ते धनंजय कुलकर्णी, डॉ. एन. बी. गायकवाड आदी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. चर्चासत्राचे आयोजन अमित कुलकर्णी, पंकज मेहता यांनी केले.

पुढारी

# अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य सुरक्षा विमा कवच

## शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची मान्यता; प्रशासनाकडून कार्यवाही सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अधिकारी-कर्मचारी व हंगामी कर्मचारी यांच्यासाठी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर 'आरोग्य सुरक्षा विमा' कवच देण्याबाबतच्या निर्णयास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने प्रशासनाकडून कार्यवाही सुरू झाली आहे.

विद्यापीठामध्ये अधिकारी-कर्मचारी, हंगामी शिक्षक, हंगामी कर्मचारी यांची संख्या



शिवाजी विद्यापीठातून...

मोठ्या प्रमाणात आहे. कोरोनाच्या संकटामध्ये हे अधिकारी, कर्मचारी राबत आहेत. आरोग्य विमा याची मागणी विद्यापीठ प्रशासनाकडे होत होती. त्या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेमध्ये हा विषय मांडण्यात आला असून त्यास मान्यता देण्यात आली आहे. १,२०० लोकांना याचा फायदा होणार आहे. यामध्ये १८ ते ३९ वर्षे वयोगट व त्यात व त्यापुढील कर्मचारी अधिकारी, हंगामी शिक्षक, रोजंदारी कर्मचारी यांना या विमा योजनेचा लाभ होणार आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशासनाने नियोजन सुरू केले आहे. संबंधितांकडून फॉर्म भरून घेण्याची कारवाई सुरू झाली आहे.

कोरोना पार्श्वभूमीवर गरज पडल्यास विद्यापीठातील अधिकारी आणि कर्मचारी यांची विद्यापीठात

> विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आरोग्य विमा मागणी केली होती. व्यवस्थापन परिषदेमध्ये मान्यता देण्यात आली आहे. पुढील कार्यवाही सुरू झाली आहे.
>
> **- डॉ. विलास नांदवडेकर,**
> कुलसचिव

निवास व्यवस्था केली जाणार आहे. यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे. विद्यापीठातील रिकामे हॉस्टेल, निवास स्थानांची दुरुस्ती करून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवण्यात यावीत, अशी मागणी विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कुलसचिवांकडे केली होती. त्यानुसार हा निर्णय झाला आहे. याबाबतची नियमावली लवकरच प्रशासकीय स्तरावर करण्यात येणार असून लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे.

Kolhapur Edition
Aug 3, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# कर्मचाऱ्यांना कोरोना झाल्यास निवासस्थानात अलगीकरण करा



प्रतिनिधी

कोल्हापूर

कोरोना रुग्णांची संख्या वाढत असल्याने शहरातील सरकारीसह खासगी दवाखानेही कमी पडत आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना कोरोना संसर्ग झाल्यास विद्यापीठातील निवासस्थानात अलगीकरणाची सोय करावी, या मागणीचे निवेदन विद्यापीठ कर्मचाऱ्यांनी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांना दिले.

निवेदनात म्हटले आहे, विद्यापीठातील कर्मचारी, अधिकारी आपले कर्तव्य बजावत आहेत. त्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ते प्रयत्न केले जातात. तरीही एखाद्या कर्मचाऱ्याला कोरोना संसर्गाची लागण झाल्यास पुणे व मुंबई विद्यापीठाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठातील निवास्थानात अलगीकरणाची सोय करावी. त्यासाठी रिकाम्या निवास्थानाची डागडुजी करून कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवावी.

यावेळी उपकुलसचिव विलास सावंत, एम. पी. कदम, बी. एम. बाघमोडे, अनिल साळुंखे, प्रशांत पाटणे आदी उपस्थित होते.

# विद्यापीठाकडे स्वत:ची रुग्णवाहिका हवी

## अधिकारी, कर्मचाऱ्यांची कुलसचिवांकडे मागणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाकडे स्वत:ची रुग्णवाहिका हवी, अशी मागणी अधिकारी, कर्मचारी यांनी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्याकडे निवेदनातून केली.

विद्यार्थी केंद्रबिंदू मानून कार्यरत असणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची कवाडे खुली करणारे विद्यापीठ म्हणून ठसा उमटला आहे. विद्यापीठाने विविध मानांकने प्राप्त केली आहेत. ही बाब भूषणावह आहे. शिवाजी विद्यापीठ ८६२ एकराच्या परिसरात विखुरलेले आहे. विद्यापीठ परिसरामध्ये कर्मचारी, अधिकारी वर्ग वास्तव्यास आहे. विद्यापीठांतर्गत कार्यरत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना वाढत्या कार्यभारानुसार येणाऱ्या अतिरिक्त कामकाजाच्या तणावामुळे अपघात, अचानक शारीरिक त्रास उद्‌भवणे, सर्पदंश, अनेक प्रकारच्या साथीच्या रोगांमुळे अचानक उद्‌भवणारा त्रास, असे प्रसंग येत आहेत. तसेच विद्यार्थ्यांना अचानकपणे काही शारीरिक समस्या निर्माण होतात. रुग्णांना विद्यापीठामधून दवाखान्यात नेण्याकरिता वाहन उपलब्ध होत नाही. ही गंभीर बाब लक्षात घेता विद्यापीठाकडे स्वत:ची रुग्णवाहिका असणे ही काळाची गरज आहे. यावेळी व्ही. एस. सोयम, जे. डी. कोळी, एस. जी. बाजे, आर. बी. शिंदे आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठात बॅ. खर्डेकर जयंती

कोल्हापूर : प्रतिनिधी

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांची ११७ वी जयंती साजरी करण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी जागर फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. बी. जी. मांगले व बॅ. खर्डेकर यांचे नातू कुटुंबीयांसह उपस्थित होते. यावेळी संचालिका डॉ. नमिता खोत, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे उपस्थित होते.

## सारांश

# बॅरिस्टर खर्डेकर यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रामार्फत बाळासाहेब खर्डेकर यांची जयंती शनिवारी साजरी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते खर्डेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी जागर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. बी. जी. मांगले आणि बॅरिस्टर खर्डेकर यांचे कुटुंबीय उपस्थित होते. त्यांनीही प्रतिमापूजन केले. यावेळी ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे उपस्थित होते.